-: प्रेसनोट दिनांक- २९/०७/२०२० :-

१) अनिकेत संताजी सरनाईक, वय २३, होमगार्ड - सनद नं. १२४१, कोल्हापूर शहर पथक, रा. शाहु कॉलनी प्लॉट नं. ६, मंगळवार पेठ, कोल्हापूर, २) निलेश विठ्ठल सुतार, वय २६, होमगार्ड - सनद नं. १५९३, कोल्हापूर शहर पथक, रा. श्री. महेकर यांचे घरी भाडयाने, हनुमान गल्ली, टेंबलाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांचे लाच मागणीबाबत........

---

यातील तक्रारदार हे होमगार्ड असुन होमगार्ड म्हणुन ३ वर्षे उत्कृष्ट सेवा सर्टीफिकेट व पुर्ननियुक्तीसाठी त्यांचे कार्यालयाने त्यांना रितसर फॉर्म भरून कागदपत्रे सादर करणेबाबत कळविले होते. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी आवश्यक कागदपत्रांसह फॉर्म भरून कार्यालयात सादर केला होता. त्यांनतर जुना राजवाडा पोलीस ठाणे इमारतीमधील होमगार्ड कार्यालयातील कार्यालयीन कामकाज करणारे होमगार्ड अनिकेत सरनाईक व निलेश सुतार यांनी तक्रारदार यांना होमगार्ड म्हणुन ३ वर्षे उत्कृष्ट सेवा सर्टीफिकेट मिळवुन देणेसाठी यांचेकडे २,५००/- रू. लाचेची मागणी केली होती. त्याबाबत तक्रारदार यांनी दि. १७/०७/२०२० रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दोन पंच साक्षीदारांचे समक्ष दि. १७/०७/२०२० रोजी जुना राजवाडा पोलीस ठाणेचे इमारतीसमोर होमगार्ड अनिकेत सरनाईक व निलेश सुतार यांचे लाच मागणीबाबत पडताळणी केली असता, जूनाराजवाडा पोलीस ठाणे इमारतीमधील होमगार्ड कार्यालयात काम करणार होमगार्ड अनिकेत सरनाईक व निलेश सुतार यांनी तक्रारदार यांना होमगार्डमध्ये ३ वर्षे उत्कृष्ठ सेवा बजावलेबाबत सर्टिफिकेट मिळवून देणेसाठी त्यांचेकडुन रु. २,५००/- लाच मागणी करून ती लाच रक्कम घेवुन येताना फोन करून जेथे असेल तेथे येण्यास सांगितलेचे निष्पन्न झाले आहे.

त्यानंतर दि. १७/०७/२०२० रोजी सापळा कारवाईचे आयोजन केले असता होमगार्ड निलेश सुतार यांनी तक्रारदार यांना सोमवार दि. २०/०७/२०२० रोजी जिल्हा होमकार्ड प्रशिक्षण केंद्र येथे येवुन भेटणेस सांगितले. त्यामुळे सदरची कारवाई तात्पुरती स्थगित ठेवण्यात आली. त्यानंतर दि. २०/०७/२०२० रोजी होमगार्ड अनिकेत सरनाईक व निलेश सुतार यांचे लाच मागणीप्रमाणे सापळा कारवाई आयोजित केली असता, दोघांनीही तक्रारदार यांचेकडुन पैसे स्विकालेले नाहीत.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे फिर्यादीवरून १) अनिकेत संताजी सरनाईक, वय २३, होमगार्ड - सनद नं. १२४१, कोल्हापूर शहर पथक, रा. शाहु कॉलनी प्लॉट नं. ६, मंगळवार पेठ, कोल्हापूर, २) निलेश विठ्ठल सुतार, वय २६, होमगार्ड - सनद नं. १५९३, कोल्हापूर शहर पथक, रा. श्री. महेकर यांचे घरी भाडयाने, हनुमान गल्ली, टेंबलाईवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांचेविरुध्द जुना राजवाडा पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रकिया सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व मा. श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, पोहेकॉ मनोज खोत, पोना विकास माने व नवनाथ कदम, पोकॉ मयुर देसाई, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४, ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.